शांतता भंग करु नका अन्यथा कारवाई
ठाणेदार अमरनाथ नागरे यांचा इशारा >>पान 2

फडणवीस आणि कोरटकर यांचे हितसंबंध >>पान 3

केंद्रातील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत आहे : केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव >>पान 4

**सुविचार**
आशा ठेवणे हेच जीवनाचे सार आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 219 ■ रविवार, दि. 23 मार्च 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




बॉलिवूडमध्ये एजिझम आणि सेक्सिझम अस्तित्वात, करीनाच्या वक्तव्याने चर्चांना उधाण! आतील पान

# शांतता भंग करणाऱ्या दंगेखोरांविरुद्ध कडक कारवाईचे निर्देश

## ■ मुख्यमंत्र्यांनी घेतला परिस्थितीचा आढावा
## ■ नागपूर शहरातील अधिकाऱ्यांची बैठकीला उपस्थिती

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : शहरातील कायदा व सुव्यवस्थेसंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वरिष्ठ पोलीस अधिकारी, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त यांच्यासोबत शहरात घडलेल्या घटनेसंदर्भात बैठक घेत आढावा घेतला. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. शांतता भंग करणाऱ्या दंगेखोरांविरुद्ध कडक कारवाईचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.**

शांतताप्रिय शहर म्हणून नागपूरची ओळख आहे. या शहराला अशांत करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात येईल. औरंगजेबासंदर्भात दुपारी आंदोलन करणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाई केल्यानंतरही समाजकटंकांनी सायंकाळी दंगा भडकवला. दंगलखोरांना नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी तत्काळ कारवाई करुन दंगल आटोक्यात आणली. परंतु, यामध्ये मोठ्या प्रमाणात वाहनांची जाळपोळ व संपत्तीचे नुकसान झाले आहे. पोलिसांवरही दगडफेक केल्यामुळे ३४ पोलीस जखमी झाले आहेत. अशा प्रकारच्या घटना शहराच्या कुठल्याही भागात घडणार नाहीत, यादृष्टीने पोलीस विभागाने सतर्क राहून कठोर कारवाई करावी. असे निर्देश यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले

### दंगेखोरांकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल

शहराच्या ११ पोलीस स्टेशनच्या परिसरात जमावबंदी आदेश लागू केले आहेत. या प्रकरणी १३ गुन्हे दाखल झाले असून ७०४ आरोपींना अटक केली आहे. १२ विधी संघर्षित बालक आहेत. सीसीटीव्ही कॅमेरे, जनतेकडून प्राप्त व्हिडीओ क्लीपच्या आधारे दंगलखोरांना शोधून कडक कारवाईचा सूचना दिल्या आहेत. संचारबंदी टप्प्याटप्प्याने हटवणार असून आक्षेपार्ह पोस्ट संदर्भात सहआरोपी केले जातील. नुकसानीचे पंचनामे करुन तीन दिवसात मदत दिली जाईल. नागपूरची शांतता भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल. दंगेखोरांकडून नुकसान भरपाई वसूल केली जाईल.

**–देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री.**



# ठाण्यातील नौपाडा पोलिसांच्या वतीने २०२३ ते २०२५ दरम्यान गहाळ झालेले शंभर मोबाईल आज तक्रारदारांना हस्तांतरण

दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** सन २०२३ ते माहे मार्च २०२५ या दरम्यान नौपाडा पोलीस स्टेशन हद्दीमध्ये तक्रारदार नागरीक यांचे गहाळ झालेले मोबाईलचा नौपाडा पोलीस स्टेशन मधील सायबर कक्षाचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी तांत्रिक विश्र्लेषणाद्वारे शोध घेवुन विविध कंपन्यांचे एकुण १०१ मोबाईल फोन परत मिळवुन तक्रारदार यांना आज दि २२/०३/२०२५ रोजी परत करण्यात आले आहेत.




वरील कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त पश्रि्चम प्रा. विनायक देशमुख, पोलीस उप आयुक्त परि ०१ सुभाष बुरसे, मा. सहायक पोलीस आयुक्त नौपाडा विभाग प्रिया ढमाळे, मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक नौपाडा पो. स्टे अभय महाजन, मा. पोलीस निरीक्षक (प्रशासन) सुनिल तांबे, मा. पोलीस निरीक्षक (गुन्हे) शरद कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक प्रतापसिंह शेळके, पोलीस अंमलदार ८१८८ करणकुमार पाटील, पोलीस अंमलदार ४७९५ अशोक कोल्हे पोलीस अंमलदार ३९८८ प्रतिक बावणे पोलीस अंमलदार २५५६ गंगाधर तिर्थकर यांनी सदरची कामगिरी केली आहे.

# नवसखी सरस महोत्सवाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** जिल्हा परिषदेच्या महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून दक्षिण मध्य सांकृतिक केंद्र येथे आयोजित जिल्हास्तरीय नवसखी सरस महोत्सवाचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.




महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आदी यावेळी उपस्थित होते.

नवसखी सरस महोत्सवात एकूण शंभर स्टॉल्स लावण्यात आले आहेत. या स्टॉल्सची पाहणी करीत मुख्यमंत्र्यांनी स्टॉलधारक महिलांशी संवाद साधला. २६ मार्चपर्यंत सकाळी दहा ते रात्री दहा या वेळेत हे प्रदर्शन सुरू राहणार आहे. ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान सुधरावे आणि त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हे शासनाचे धोरण यशस्वी करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस आहे. त्यासाठी विविध प्रदर्शनाच्या माध्यमातून महिलांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली जाते. या संकल्पनेतूनच हे आयोजन करण्यात आले आहे.

# वक्फ हा कायदा कुठल्याही इस्लामिक राष्ट्रात नाही

## नितेश राणे यांची माहिती : माध्यमांशी साधला संवाद

दैनिक आपला विदर्भ

**सिंधुदुर्ग/प्रतिनिधी :** वक्फ हा कायदा कुठल्याही इस्लामिक राष्ट्रात नाही. ना पाकिस्तानमध्ये आहे. ना बांगलादेशमध्ये. तो फक्त आमच्या हिंदू राष्ट्र असलेल्या केवळ भारतात आहे. आता मोदी सरकार जे वक्फ बिल जे आणत आहे.त्यामुळे मोठ्या प्रमाणात ज्या हिंदू समाजाच्या ज्या जमिनी घेतल्या आहेत, बळकाविलेल्या आहेत, जबरदस्तीने कब्जा केलेल्या आहेत, ज्याचा न्याय किंवा अधिकार मागण्याचा अधिकार सुद्धा हिंदूना नाही, तो मिळवून देण्याचा अधिकार आणि जमिनी मिळवून देण्याचे काम मोदी सरकार करीत आहे. या विधेयकात अशी ही तरतूद आहे की, वक्फ अंतर्गत जर कोणी तुमची जमीन हडप केली तर, हायकोर्टात जाऊ शकता. तसेच समितीत आता हिंदू सदस्य सुद्धा असणार. त्यामुळे हिंदू समाजाच्या जमिनी हडपल्या जात होत्या त्या बंद होतील. असे मत मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केले.

यावेळी ते म्हणाले की, सिंधुदुर्ग जिल्हा साहित्य संमेलन २०२५ या संमेलनासाठी मी शुभेच्छा देण्यासाठी आलो होतो.



जिल्ह्यातील ग्रंथालयांची परिस्थिती बदलावी किंबहुना आधुनिकीकरण व्हावे, जिल्ह्यात पहिले डिजिटल ग्रंथालय सुरू होण्यासाठी तयारी सुरू आहे. जेणेकरून वाचक वर्ग वाढला पाहिजे, भावी पिढी ग्रंथालयांमध्ये आली पाहिजे या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत. तसेच जिल्ह्यात नाट्यगृह बांधण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आपल्याकडील साहित्याचे जतन करण्यासाठी जे जे प्रयत्न सुरू आहेत ते मी सुद्धा करतोय. मराठी भाषा भवन मुंबईत बनतेय. आम्हा प्रत्येकाला त्याचा अभिमान आहे. तसेच मालवणी बोली भाषा आमची असून तिचा आम्हाला अभिमान आहे. त्यामुळे कोकणात मालवणी भाषा भवन व्हावे असा विचार आहे. कोकणातील सर्व साहित्यिकांनी जर ही इच्छा व्यक्त केली तर त्याची सरकार म्हणून जबाबदारी घ्यायला मी तयार आहे.असे ते म्हणाले. दिशा सालियानच्या वडिलांनी न्यायालयात याचिका दाखल केली ही चांगली गोष्ट आहे. संबंधित प्रकरण कोर्टासमोर मांडतील. त्यावेळी न्यायालय योग्य तो निर्णय देईल. दिशा आणि सुशांतसिंग राजपूत यांना न्याय मिळेल. किशोरी पेडणेकर यांनी खरंतर सत्य बोललं पाहिजे. त्या तीन तास दिशा सालियान आणि तिच्या आई–वडिलांकडे जाऊन काय करत होत्या ? किती दबाव टाकला ? किती धमक्या त्यांनी दिल्या? आमचे ब्रेनवॉश केले जात होते, असे दिशाच्या आई–वडिलांनी सांगितले आहे. हे आरोप आम्ही केलेले नाही दिशाच्या आई– वडिलांनी केलेत. जो स्वतः डोक्याने खाली असतो त्याला सगळेच मनोरुग्ण वाटतात. वेड्यांच्या हॉस्पिटलमध्ये गेलात तर, प्रत्येक वेळेला सगळेच वेडे दिसतात. तसे उद्धव ठाकरे हे मनोरुग्ण आहेत. त्यामुळे संजय राऊत यांची चूक नाही ते स्वतःच मनोरुग्ण आहेत. उद्धव ठाकरे यांना कशा दंगली घडवायच्याच्या होत्या. या तारखेनुसार मी सांगू शकतो. मातोश्रीवर कधी कधी या संदर्भात बैठक झाल्या आहेत. याचे काही पुरावे माझ्याकडे आहेत. कीर्तिकर यांना बोलावून दंगलीचे प्लानिंग मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांनी केले होते. त्यामुळे उद्धव ठाकरे यांना जेवढे आम्ही ओळखतो तेवढे संजय राऊत ओळखत नाहीत. असे मंत्री नितेश राणे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

# नागपूर येथे घडलेली दंगल दुर्दैवी

## सर्वांनी सोबत आनंदाने राहावे प्रफुल पटेल यांचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**गोंदिया/प्रतिनिधी :** नागपूर मध्ये जी दंगल घडली ती दुर्दैवी आहे. असं व्हायला नको होते. नागपूरची आणि महाराष्ट्राची संस्कृती ही सगळेजण सोबत राहण्याची आहे. मात्र केवळ अफवांच्या भरोसावर नागपूरची दंगल घडली. मात्र आता नागपूर शांत आहे आणि महाराष्ट्र ही शांत आहे. असे म्हणत सर्व नागरिकांनी सोबत राहण्याचे आवाहन यावेळी राष्ट्रवादी नेते प्रफुल्ल पटेल यांनी केले.



माध्यमांशी बोलताना ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांचा अपमान करणारा प्रशांत कोरटकर हा दुबईला पळून गेल्याची माहिती आज समोर आली. यावर प्रफुल पटेल यांना विचारले असता आपण महाराष्ट्राच्या संस्कृतीला टिकवून ठेवायला पाहिजे, छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दल सर्वांनाच आदर आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांना कोणत्या एका समूह आणि धर्माशी जोडू नये, संपूर्ण देश वासियांना छत्रपती शिवाजी महाराज यांच्या बद्दल आदरणीय अभिमान असायला पाहिजे. आज सकाळी जयंत पाटील आणि अजित पवार यांची बंद दार चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे.मात्र विकासाच्या मुद्द्यासाठी सर्वजण एकमेकांना भेटत असतात. त्यामुळे आम्ही असे भेटींचा काही वेगळा अर्थ काढत नाही अशी प्रतिक्रिया प्रफुल पटेल यांनी दिली असून आम्ही आपलं काम करतो कोणाच्या पक्षात काय चाललंय याचा विचार आम्ही करत नाही असे ते म्हणाले.

## जरा याद करो कुर्बानी

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९४ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्र्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शाहिद दिनी विनम्र अभिवादन!

# शांतता भंग करू नका अन्यथा कारवाई ठाणेदार अमरनाथ नागरे यांचा इशारा

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** दोन समाजामध्ये वाद निर्माण सामाजिक शांतता भंग होईल असा कोणताही प्रकार कोणीही करू नये अन्यथा कारवाई केल्याचे असा इशारा डोणगाव पोलीस स्टेशनचे ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी दिला आहे.

वादग्रस्त तसेच आक्षेपार्ह स्टेटस ठेऊन दोन समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण करु नये, तसेच शांतता भंग करु नये. सध्या नागपुर तसेच महाराष्ट्र राज्यात इतर ठिकाणी जातीय आ तेढ निर्माण होण्याची प्रकरणे सुरु आहेत. त्यामुळे सर्व जनतेने आपल्या चुकीच्या स्टेटस तसेच चुकीच्या पोस्टमुळे कुणाच्या धार्मीक भावणा दुखावणार नाही, याची काळजी घ्यावी. कोणत्याही व्यक्तीने ठेवलेल्या चुकीच्या स्टेटस तसेच चुकीच्या पोस्टमुळे कुणाच्या धार्मीक भावना दुखावल्यास सदर व्यक्तीवर प्रचलित कायद्यानुसार गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात येईल. तसेच जातीय सलोखा अबादीत राहुन शांतता राखण्यासाठी सहकार्य करावे. असे आव्हान यावेळी ठाणेदार अमरनाथ नागरे यांनी केले.



### आक्षेपार्ह स्टेटस ठेवणे तरुणाला पडले महाग

मेहकर : पोलीस स्टेशन हद्दीतील बाऱ्हई गावातील एका तरुणाने इन्स्टाग्रामवर धार्मिक भावना भडविणारे स्टेटस ठेवणे त्याला चांगलेच महागात पडले आहे. सदर गावातील एका युवकाने एका ठरावीक समाजाची भावना दुखावणारे स्टेटस त्याचे मोबाईलवरील इंस्टाग्रामवर ठेवल्याने सदर गावातील लोकांनी मेहकर पोलीसांना कळविल्याने पोहेकॉ. विजय बेडवाल यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीवरुन विविध कलमान्वये गुन्हा दाखल करुन प्रभावीपणे कारवाई करण्यात आलेली आहे.तरी, मेहकर पोलीसांकडुन सर्व जनतेस आवाहन करण्यात येते की, अशाप्रकारचे वादग्रस्त स्टेटस ठेऊन दोन समाजामध्ये धार्मिक तेढ निर्माण करु नये, तसेच शांतता भंग करु नये. सध्या नागपुर तसेच महाराष्ट्र राज्यात इतर ठिकाणी जातीय तेढ निर्माण होण्याची प्रकरणे सुरु आहेत. त्यामुळे सर्व जनतेने आपल्या चुकीच्या स्टेटस तसेच चुकीच्या पोस्टमुळे कुणाच्या धार्मीक भावना दुखावणार नाही तसेच जातीय सलोखा अबाधित राहुन शांतता राखण्यासाठी सहकार्य करावे. कसे आहात करण्यात आले आहे.

## क्रूर आणि सूड भावनेने वागणारा माणूस म्हणजे फक्त देवेंद्र फडणवीस - मनोज जरांगे पाटील




दैनिक आपला विदर्भ

**जालना/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराजांबद्दल आक्षेपार्ह विधान करून इतिहासकार इंद्रजीत सावंत यांना जीवे मारण्याची धमकी देण्याचा आरोप असलेला नागपूर येथील पत्रकार प्रशांत कोरटकर हा गेल्या २५ दिवसांपासून फरार आहे. यावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली आहे. प्रशांत कोरटकर पोलिसांना सापडत नाही, हे पोलिसांचे अपयश नाही, देवेंद्र फडणवीस घडवून आणत आहेत. त्यांचे सोयरे आहे, अपमान करणारे सगळे त्यांचे सोयरे आहेत. त्यांनी एक टोळी तयार केली आहे. ती छत्रपती शिवाजी महाराजांचा आणि महापुरुषांचा अपमान करते. ते फक्त दाखवायला हिंदू दाखवतात. त्यांना बळ कोण देतं? त्यांना बोलायचं कोण सांगतं. यानंतर देवेंद्र फडणवीस दाटून मुटून बोलतील.

फडणवीस फक्त गोरगरिबाच्या लेकरांचं वाटोळं करू शकतात. त्यांनी काही जण फक्त जाणून-बुजून अवमान करण्यासाठी ठेवले आहेत. आता आम्हाला कळले की, मागील सत्तर वर्ष त्यांनी आमचा वापर फक्त भांडणासाठीच केला आहे. आम्ही जर हिंदू आहे तर आम्हाला मोठं कधी करणार आहे. हिंदू-हिंदू म्हणून आमचा घात किती दिवस करायचा आहे. धर्माचे रक्षण करणारी जात मराठा आहे, तुम्ही तिला संपवायला लागलात. अशी टीका जरांगे पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरकेलीआहे.

## बॉलिवूडमध्ये एजिझम आणि सेक्सिझम अस्तित्वात, करीनाच्या वक्तव्याने चर्चांना उधाण!

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बॉलिवूडची आघाडीची अभिनेत्री करीना कपूर नेहमीच आपल्या स्पष्ट मतांसाठी ओळखली जाते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत करिनाला काही प्रश्र्न विचारण्यात आले. यावेळी, लग्नानंतरच्या कामाच्या पसंती आणि वयाच्या चाळिशीनंतर मिळणाऱ्या भूमिकांबाबत चर्चा करताना बॉलिवूडमधील एजिझम आणि सेक्सिझम अद्यापही अस्तित्वात आहे का, असा प्रश्र्न उपस्थित केला.



तर तुम्हाला काम मिळेल-

करीना कपूर हिने यावर उत्तर देताना स्पष्ट सांगितले की, अशा गोष्टी फक्त सोशल मीडियावरच असतात, प्रत्यक्षात नाही. ती म्हणाली, ही चर्चा करण्यासाठी एक चांगला विषय आहे. लोक यावर लेख लिहितात, डिबेट करतात. ती म्हणाली की अजूनही अनेक अभिनेत्री काम करत आहेत आणि त्यांना संधी मिळत आहे. जर तुमच्यात टॅलेंट आहे, चांगलं दिसताय, आणि स्वतःवर विश्र्वास आहे, तर तुम्हाला काम मिळेल, असे ती म्हणाली.

ती पुढे म्हणाली की, वय फक्त एक आकडा आहे आणि प्रत्येक वयोगटातले लोक चांगली कामगिरी करत आहेत. करीना हिने उदाहरण देताना सांगितले की ती लाल सिंग चड्ढा चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान आपल्या दुसऱ्या मुलासाठी पाच महिन्यांची गरोदर होती. तिने सांगितले की आलिया भट्ट सुद्धा गरोदर असतानाही काम करत आहे. त्यामुळे आव्हान स्वीकारून तो साखळदंड तोडायला हवा, असे करीना हिने ठामपणे सांगितले.

दरम्यान, सोशल मीडियावर चित्रपटांवर टीका होत असून ट्विटरवर 'बॉयकॉट' ट्रेंड सुरू आहे. यावर बोलताना करीना म्हणाली, आज अनेक प्लॅटफॉर्मवरून लोकांना आपली मते मांडण्याची मोकळीक आहे. पण प्रत्येक वेळी सर्व काही गांभीर्याने घेणं गरजेचं नसतं. प्रत्येकाला मत आहे, पण काही गोष्टी दुर्लक्षित करायला शिकलं पाहिजे, असं ती म्हणाली.

तिने स्पष्ट केलं की जर चित्रपट चांगला असेल, तर प्रेक्षक नक्कीच पाहायला जातील. सामाजिक माध्यमांवरील टीका मागे टाकण्यासाठी चित्रपट उत्कृष्ट असायला हवा, असं ती म्हणाली.

मी पक्ष्यासारखी आहे, उडून जाते-

एक मजेशीर प्रश्र्न विचारण्यात आला की चित्रपट रिलीज झाल्यानंतर ती त्या भावनेत गुंतून राहते का? यावर ती हसत म्हणाली, मी पक्ष्यासारखी आहे, उडून जाते. ती म्हणाली की दररोजचा अनुभव वेगळा असतो आणि प्रत्येक दिवस 'वाव' नसतो. मात्र तिने हे शिकून घेतले आहे की, प्रत्येक गोष्टीवर मात करून आयुष्यात पुढे जायचं असतं.

# गडचिरोलीतील मानवावरील वाघांचे हल्ले रोखण्यासाठी तीन महिन्यात आराखडा तयार करा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** गडचिरोली जिल्ह्यात व्याघ्र हल्ल्यातील मनुष्यहानी टाळण्यासाठी परिस्थितीचा तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यास करून तातडीने विशेष उपाय योजना राबविण्याचे निर्देश मुख्यमंत्री तथा गडचिरोलीचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. यामध्ये गेल्या पाच वर्षात वाघ्र हल्ल्यातील मृत्यूमुखींच्या कुटुंबियांना विशेष नुकसान भरपाई देणे, अतिरिक्त वाघांचे स्थलांतर आदींचा समावेश असून त्याचा अहवाल तीन महिन्यात देण्याचे निर्देश मुख्यमंत्री महोदयांनी दिले आहेत.


मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वाघांच्या हल्ल्यातील नागरिकांच्या जिवीत हानीची गंभीर दखल घेतली आहे. गडचिरोलीचे पालकमंत्री म्हणून त्यांनी तेथील नागरिकांच्या मागणीची तत्काळ दखल घेऊन यावर उपाय योजना सुचविण्याचे निर्देश दिले. तसेच यासाठी मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार श्री. परदेशी यांनी नागपुरात वरिष्ठ वन अधिकाऱ्यांची बैठक घेऊन उपाय योजनांवर चर्चा केली व त्यावर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. या बैठकीस राज्याच्या प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) शोमिता बिस्वास, अपर प्रधान मुख्य वन संरक्षक विवेक खांडेकर, ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे मुख्य वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक डॉ. रामचंद्र रामगावकर, गडचिरोली वन वृत्ताचे मुख्य वन संरक्षक एस. रमेशकुमार आदी उपस्थित होते.



व्याघ्र हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबियांना विशेष नुकसान भरपाई

गडचिरोली जिल्ह्यात गेल्या पाच वर्षांत व्याघ्र हल्ल्यात सुमारे ५० हून अधिक मनुष्याचा मृत्यू झाला आहे. विशेषतः गडचिरोली, चार्मोशी, आरमोरी, वडसा आणि धानोरा क्षेत्रात वाघांच्या हल्ल्यात नागरिकांचा मृत्यू झाला आहे. गडचिरोलीतील परिस्थितीचा अभ्यास करून गडचिरोलीतील अतिरिक्त वाघांचे स्थलांतर तीन महिन्यात करण्यात यावेत. तसेच गेल्या पाच वर्षांत व्याघ्र हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांची माहिती गोळा करून त्यांच्या वारस कुटुंबियांना विशेष नुकसान भरपाई देण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले होते.

यासंदर्भात परिस्थितीचे अवलोकन करून आराखडा तयार करण्यासंदर्भात मुख्यमंत्री तथा गडचिरोलीचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सुचनेनुसार 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक झाली. या बैठकीत विविध उपाययोजनांवर चर्चा झाली. यामध्ये गडचिरोली जिल्ह्यातील चपराळा व प्राणहिता अभयारण्यात सागवान झाडांचे विरळीकरण करणे व कुरणाचे प्रमाण वाढविण्याचा निर्णय झाला. जेणेकरून तृणभक्षी प्राण्याची संख्या वाढून मांस भक्षी प्राण्यांना खाद्य मिळेल. प्रत्येक गावात पोलिस पाटीलच्या धर्तीवर वन पाटील नेमण्याचेही यावेळी ठरविण्यात आले. स्थानिकांना जंगलात लाकूड, सरपण गोळा करण्यासाठी जंगलात जावे लागू नये यासाठी गावामध्ये पाइपलाइनद्वारे उइऋ गॅस पुरवठा करण्यासाठी ग्रामस्थांच्या शेतात गवत उत्पादन करून त्याचा उपयोग सीबीजीसाठी करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला. त्यासाठी सीबीजी गॅस प्लांट उभारण्याचेही ठरविण्यात आले. वन्य प्राण्यामुळे नुकसान झालेल्या पिकांची नुकसान भरपाई लवकर देण्यासाठी ई पंचनामा करणे, वाघांची वाढती संख्या लक्षात घेऊन चपराळा अभयारण्यातील ६ गावांच्या स्थलांतरासाठी तेथील स्थानिकांचे सामाजिक, आर्थिक मूल्यांकन करणे, पुनर्वसनासाठी नव्या जागेचा शोध घेणे आदी उपाय योजना राबविण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.




तसेच यासंबंधीच्या उपाय योजना करण्याबाबत या विषयावर काम करणाऱ्या वाईल्ड लाईफ इन्स्टिट्यूट सारख्या संस्थांच्या तज्ञांची नेमणूक करण्यात येणार आहे. धोकाग्रस्त व संवेदनशील क्षेत्राचे सौम्यीकरण (मिटीगेशन) आराखडा तयार करण्याबाबतही यावेळी चर्चा करण्यात आली. मानव आणि वन्यजीव संघर्षात आढळणारे वाघ हे वयस्कर असल्याचे दिसून येते. अशा वाघाच्या स्थलांतर संदर्भातही धोरणात्मक निर्णय घेण्याचे आवश्यक असल्याचे मत यावेळी मांडण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शिरवणे एमआयडीसी कंपनीमधील तब्बल नऊ तासानंतर आग आटोक्यात



दैनिक आपला विदर्भ

**नवी मुंबई/प्रतिनिधी :** नवी मुंबईतील शिरवणे एमआईडीसीमध्ये रात्रीच्या सुमारास भीषण आग लागली होती. शिरवने एमआईडीसी मधील शुभदा कंपनीमध्ये आग लागल्याची घटना रात्री ११.३० च्या सुमारास घडली. आग इतकी भयंकर होती की आग विझवण्यासाठी अग्नीशम दलाचे शर्थीचे प्रयत्न सुरू होते. या आगीमध्ये कंपनीच मोठ्या प्रमाणात नुकसान झाल आहे. तब्बल नऊ तासानंतर आग आटोक्यात आली आहे. घटनास्थळी अग्नीशम दलाच्या दहा ते १२ गड्या दाखल होऊन आग आटोक्यात आणली आहे.

प्राथमिक महितीनुसार आत्ता पर्यंत कोणतीही जीवितहानी नसल्याची माहिती आबासाहेब पाटील वरीष्ठ पोलीस निरीक्षक तुर्भे एमआयडीसी यांनी सांगितल. तर प्रत्यक्षदर्शींनी सुद्धा म्हटलं की रात्री लागलेली हा ही खूप भयंकर होती, परिसरात भीतीचं वातावरण होतं.

### अजित पवार आणि जयंत पाटील यांच्या भेटीनंतर छगन भुजबळ यांचे स्पष्टीकरण




दैनिक आपला विदर्भ

**जळगाव/प्रतिनिधी :** अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळांनी औरंगजेबच्या कबरीवरून झालेल्या हिंसाचार प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. भुजबळ म्हणाले की, पोलीस पोलिसांचं काम करत आहेत. जो चुकला असेल त्याच्यावर कायद्याप्रमाणे कारवाई होईल. सक्तीची कारवाई केली जाईल, मुख्यमंत्र्यांनी हे विधानसभेत देखील सांगितलं आहे. तर कोरटकर वर्षा बंगल्यावर असतील तर संजय राऊत यांनी तेथे जाऊन कोरटकरांना घेऊन यावे.

तसेच त्यांनी अजित पवार आणि जयंत पाटील यांच्याा भेटीवर देखील भाष्य केलं. आमची भेट रोजच होते, विधानसभेतही होते. मग आम्ही काही मारामाऱ्या करायच्या का? प्रत्येक जण विधानसभेत एकमेकांना भेटतो, हाल हवाल विचारतो. राजकारणात आम्ही विरोधी पक्षात आहोत, एकमेकांचे शत्रू नाही, असं भुजबळ यांनी म्हटलंआहे.

### अंतराळवीर सुनिता विल्यम यांच्या कार्यास फलक रेखाटून कलाशिक्षक देव हिरे यांच्याकडून सलाम




दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** अमेरिकन अंतराळ संस्था नासाच्या अंतराळवीर सुनिता विल्यम आणि बुच विल्मोर अखेर ९ महिन्यानंतर पृथ्वीवर परतले.फ्लोरिडाच्या समुद्र किनाऱ्यावर त्यांचे यशस्वी लँडिंग झाले. इलॉन मस्क यांच्यास्पेसएक्स च्या ड्रॅगन यानाच्या साह्याने पृथ्वीवर परतले. सुनिता विल्यम्स या मूळच्या भारतीय वंशाच्या असल्याने हा ऐतिहासिक प्रसंग तमाम भारतीयांना अभिमानास्पद व प्रेरणादायी आहे आलेल्या बिकट संकटाला धैर्याने संयमाने साहसाने सामोरे जाण्याची प्रेरणा यातून निश्चितच मिळेल. या संदर्भात येत्या तरुण विद्यार्थी -विद्यार्थ्यांना या गोष्टीची जाणीव व्हावी म्हणून चांदवड तालुक्यातील भाडगाव येथील नूतन माध्यमिक विद्यालय भाटगाव तालुका चांदवड जिल्हा नाशिक या शाळेच्या कलाशिक्षक देव हिरे यांनी रंगीत खडू माध्यमातून शाळेच्या दर्शनी फलकावर सुनिता विल्यम्स यांच्या कार्याला सलाम केला आहे.

### आदित्य ठाकरेचा काही संबंध नाही : आमदार विजय वडेट्टीवार

**नागपूर/प्रतिनिधी :** सीबीआय पेक्षा एसआयटी मोठी नाही, यात आदित्य ठाकरेचा काही संबंध नाही.अशी माहिती आमदार विजय वडेट्टीवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी बोलताना आमतदार विजय वडेट्टीवार म्हणाले की, नागपूर घटनेत प्रशासन फेलिव्हर आहे. चादर जाळली, ते पोलिसांनी होऊ दिले नसते. औरंगजेबची कबर ही शिवाजी महाराज यांच शौर्य दाखवणारी आहे.

# फडणवीस आणि कोरटकर यांचे हितसंबंध

## काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांचा आरोप

दैनिक आपला विदर्भ



**पुणे/प्रतिनिधी : छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल चुकीचे विधान करणारा विकृत माणूस कोरटकर हा देशाबाहेर पळून गेला आहे. देवेंद्र फडणवीस सरकारने योजना आणली आहे की महाराजांचा अपमान करा आणि सुरक्षा मिळवा, फडणवीस आणि कोरटकर यांचे हितसंबंध आहेत. त्याला सुरक्षा मिळत असेल त्यानंतर महाराजांचा अपमान केल्यावर त्याला सुरक्षा कस काय मिळते, तो पळून कसा जातो. असा प्रश्न काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकार परिषदेत उपस्थित व्यक्त केले.**

यावेळी बोलताना ते म्हणाले की, पुणे शहराचे एक वेगळे महत्व आहे. अनेक आंदोलन आणि चळवळी या शहरात सुरू झाल्या आहेत. पुण्याची सभ्य आणि सुसंस्कृत समज निर्मितीची शिकवण आहे.कोरटकरवर सरकार कारवाई का करत नाही, नाहक औरंगजेबाचा मुद्दा उकरून काढला आहे. जी भाषा तुम्ही औरंगजेबाची कबर उखडायची. इंग्रज देखील तेवढेच जुलमी होते. क्रूर होते, त्यांचे हस्तक म्हणून राहिलेले बरेच लोक आहेत. आजही हे लोक महाराष्ट्रात आहेत. या लोकांनी इंग्रजांकडून पेन्शन घेतली या सगळयांची कबरी, पुतळे आणि स्मारक विश्र्व हिंदू परिषद तोडणार का? असा प्रश्नही यावेळी त्यांनी केला. सरकार काय करत आहे. कोरटकर दुबईला कसं काय पळून गेला, देशाचा गृह विभाग झोपला होता का? माझा आरोप आहे की, महाराष्ट्रातील पोलिसांनी पळून जाण्यासाठी पोलिसांची फुस आणि पोलिसांची मदत होते. पोलिसांना मदत करायला देवेंद्र फडणवीस यांनी भाग पाडले का? असा प्रश्न त्यांनी केला. एखादा मंत्र्याचा मुलगा पळून जातो तर त्याला लागलीच वापस आणले जाते. त्याचे विमान लगेच सापडले जाते. पण आरोपी तुमच्या डोळ्यादेखत दुबईला पळाला, आरोपी हा कसकाय फरार झाला? असा प्रश्न निर्माण होत आहे. महाराजांचा अपमान करणारा दुसरा माणूस पुण्यात आहे. सोलापूरकरचे डोकं ठिकाणावर नाही, संतोष देशमुख यांची क्रूर हत्या झाली आहे. बीड जिल्ह्यातील पोलिस यंत्रणा हतबल झाली आहे.तिथे पोलीस यंत्रणा राहिली नाही. स्वारगेट बलात्काराचा दुर्देवी प्रसंग घडला. परभणीमध्ये हत्या झाली. तरी सरकार काही करू शकले नाही. देशात आणि राज्यात कायदा सुव्यवस्थेची लत्करे टांगली गेली आहेत. हा तुघलकी कारभार चालू आहे. देवेंद्र फडणवीस राज्यात तुघलकी कारभार करत आहेत. माझ्या विधानावर आजही मी ठाम आहे. देवेंद्र फडणवीस आणि औरंगजेब यांचा कारभार सारखाच आहे. मी माझ्या विधानावर ठाम आहे. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, माझ्यावर देशद्रोहाचा, राजगृहाचा आणि राष्ट्रद्रोहाचा गुन्हा दाखल करा मी आजही ठाम आहे. मी माफी मागणार नाही. राहुल सोलापूरकर यांनी केलेल्या विधानवर तुम्ही काय करणार आहात, कोटकर देशबाहेर गेला तुम्ही काही करू शकलात नाही. तिकीट मिळने हे भाग्यचे लक्षण आहे. त्यांचा भावा असतो, पंजा भेटला जर एखाद्या व्यक्तीला ३ वेळेस ज्याला चिन्ह मिळाले. त्यांच्या जाण्याने सत्ता सत्ता इतकंच कारण आहे. सत्तेसाठी गेलो हे त्यांनी सांगितले. विचारांची ऐसी की तैसी असचे आहे. जिधर बम उधर हम ही संस्कृती फोफावत आहे. असे मत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची पत्रकार परिषदेत व्यक्त केले.



## कोरटकरचा पासपोर्ट ताब्यात घ्यावा

### इंद्रजित सावंत यांची मागणी



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** महिना झाला असतानाही अद्यापही कोरटकरला अटक झालेली नाही, हे गृह खात्याचे अपयश आहे. छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान करणारा व्यक्ती सुटता कामा नये,कोरटकरचा पासपोर्ट ताब्यात द्यावा, अशी आम्ही मागणी केली आहे. अशी माहिती इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

यावेळी ते म्हणाले की, शासनामध्ये अशा व्यक्तीला मदत करणाजया व्यक्ती शोध घेतला पाहिजे, त्यांचा बुरखा काढला पाहिजे,हे मंत्र्यांचे काम आहे आणि यावर लक्ष देतील असे मला वाटते. माझा आणि कोरटकरचा कधीच संबंध आलेला नव्हता. माझा मोबाईल नंबर त्याला कोणी दिला हे तपासायला पाहिजे, त्याच्या मोबाईल मधील संवाद तपासायला हवा,असीम सरोदे यांना याबाबत विचारायला हवे, कदाचित त्यांच्याकडे याबाबत ठोस माहिती असू शकते. कोरटकरचा पासपोर्ट ताब्यात घ्यावा अशी मागणी आम्ही केलेली आहे.मुख्यमंत्री एक गृहमंत्री सुद्धा आहेत. त्यांनी हा विषय गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. समाजामध्ये तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्तीवर कारवाई करावी, कोणतीतरी यंत्रणा या व्यक्तीच्या पाठीमागे आहे. ही माझी शंका आहे. कोरटकरला वाचवण्याचा प्रयत्न करणाऱ्या यंत्रणेला शोधले पाहिजे, असे मत यावेळी इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी व्यक्त केले.

# दलितांकडे कमी लक्ष दिले जाते

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची पत्रकार परिषदेत आरोप



**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** राजकीय पक्ष चालवायचा असेल तर मतांचा पक्ष लागतो. लाडक्या बहिणीला २१०० रुपये देणे अवघड जात आहे. सरकारने दिलेल्या आश्वासनामुळे महिलांनी मतदान केले आहे, पुढच्या बजेट आधी लाडक्या बहिणींचे पैसे द्यावेत. सोमनाथ सूर्यवंशी यांची हत्या झाली. दलितांकडे कमी लक्ष दिले जाते. असा आरोप केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी पत्रकार परिषदेत केला.

यावेळी ते म्हणाले की, राज्य सरकारने खाजगी क्षेत्रात आरक्षण देण्याचा निर्णय घ्यावा. भाऊराव पाटील यांनी जसे कमवा आणि शिका योजना सुरू केली,तशीच किंवा शिकवा योजना सुरू करून ५-१० हजार द्यावेत. औरंगजेबाला ५०० ते ६०० वर्ष वेळ झाला. मुस्लिमाना सांगतो आपली औलाद औरंगजेबाची नाही. छत्रपती संभाजी महाराजांनी जबरदस्त कर्तृत्व निर्माण केले आहे. तो चांगला प्रशासक म्हणणे चुकीचे आहे. औरंगाजेब हरामखोर होता. विनाकारण हा विषय काढून नये, कबर हटवा या मागणीला आमचा पाठिंबा नाही. कबर हटवू नका मात्र, संभाजी महाराजांचे स्मारक असावे अशी आमची इच्छा आहे. नागपूर येथे पूर्वनियोजन करून दंगल घडवली. दंगल करणाऱ्यांना कठोर कारवाई करावी. हिंदू यांना सांगतो शांत रहा. विनाकारण वाद निर्माण करू नका. सर्व देशातील मंदिर हे बुद्धांचे होते. मुस्लिम समाजाने आपले नाते औरंगजेबाशी जोडू नये. गया बौद्ध विहार मंदिर आमच्या ताब्यात द्या. मी स्वतः बौद्ध गया येथे जाणार आहे. सर्व धर्माचे ट्रस्टी असावेत आताचे असणारे ट्रस्टी रद्द करावी अशी आमची मागणी आहे. बौद्ध धर्माच्या ट्रस्ट मध्ये इतराना घेऊ नये, नेत्यांनी वाद लावू नये. वाद झाले तर, देशाच्या विकासाला गती मिळणार नाही. जातीय तेढ निर्माण करू नये.नेत्यांनी तसे बोलू नये,आमदार आणि मंत्र्यांनी शपथ घेतली असून त्याची जाण ठेवावी. तसेच पालकमंत्री पदाचा वाद मिटवायचा असेल तर आरपीआयला मंत्री पद द्यावे, दिशा सालियानच्या वडिलांनी चार नाव असलेले पत्र दिले. त्यात हत्या करणाऱ्यांच्या नावे होते. तिची हत्या झाली हे पालकांनी सांगितले. मी असे म्हणणे नाही की, आदित्य ठाकरे यांच्यावर कारवाई करू नका. कुणीही असेल तर कारवाई करावी, बाळासाहेब आंबेडकर जोपर्यंत ऐकत नाही तोपर्यंत ऐक्य होणार नाही. निधी वळवला असेल तर दुसऱ्या खात्यातून घ्यावा. निधी वळवू नये. संजय शिरसाट लक्ष देतील. सामाजिक न्याय खात्याचा निधी वळवू नये. भीमराव आंबेडकर - कायद्याचे राज्य आहे. चॅरिटी कमिशनने दोन वेळा निकाल दिला की, आठवले हे चेअरमन आहे. कोर्टाने सांगितले चॅरिटी कमिशन योग्य आहे. मी चेअरमन आहे तर, माझ्या नेतृत्वात काम करावे. प्राचार्य ऐकत नाही. बौद्ध गया चा विषय मोदींच्या हातात नाही, मोदी यांनी नितेश कुमार यांना सांगितले तर ऐकतील. असे मत यावेळी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केले.

# दिशा सालियन प्रकरणात नारायण राणेंचा मोठा खुलासा

## राजकीय वर्तुळात खळबळ निर्माण होण्याची शक्यता

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दिशा सालियन प्रकरणाला चार वर्षाचा कालावधी झाल्यानंतर अचानक प्रकरण चर्चेत आले आहे.असे असताना दिशा सालियन प्रकरणात नारायण राणे यांनी मोठा खुलासा केल्याने मोठी खळबळ निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. माध्यमांशी बोलताना नारायण राणे म्हणाले की, ही घटना घडली तेव्हा मी मुंबईवरून घरी चाललो होतो, तेवढ्यात वांद्रे क्रॉस केल्यावर फोन आला. मिलिंद नार्वेकरचा फोन होता. म्हणाले, दादा साहेबांना तुमच्याशी बोलायचं आहे. मी म्हटलं, कोण साहेब. म्हणाले, उद्धवजी, त्यांच्याबरोबर मी आहे. ते गाडी चालवत आहेत. त्यांना बोलायचं आहे. मी म्हटलं, द्या.त्यांनी फोन घेतल्यावर मी म्हटलं जय महाराष्ट्र साहेब, बोला, ते म्हणाले, तुम्ही अजून जय महाराष्ट्र बोलता. मी म्हटलं, मरेपर्यंत बोलणार. तुम्हाला माहीत आहे मी थांबत नाही. उद्धव ठाकरे म्हणाले, नाही साहेब मला हे बोलायचंय तुम्हाला मुलं आहेत. मलाही मुलं आहेत. सध्या तुम्ही जे काही प्रेसला बोलता. आदित्यचं नाव घेता. माझी विनंती आहे की, तुम्ही त्याचा उल्लेख करू नये. असे वाटते म्हणून विनंती करायला फोन केला. मी म्हटले, उद्धवजी एक गोष्ट लक्षात ठेवा. एक तर मी अमूक ठिकाणी, अमूक याच्यात कोण आहे.याचा उल्लेख केला नाही. निरपराध एका मुलीची अत्याचार करून हत्या झाली हे म्हणतोय. आरोपींना अटक झाली पाहिजे हे म्हणतोय. त्यात तडजोड नाही. फक्त तुम्ही तुमच्या मुलाचे नाव घेतले, त्याला संध्याकाळी जिथे जातो, तिथे जाण्यापासून सांभाळा. सांगा त्याला हे बरं नाही. माझ्या घराच्या समोर तो डिनो मोरिया राहतो.तिथे हे लोक जमतात आणि काय साडे तीन चार तास धुमाकूळ घालतात. मला माहीत नाही. मला माहीत आहे, पण तुम्हाला सांगणार नाही. म्हणून मी सांगितलं तुम्ही त्यांना सांभाळा. उद्धव ठाकरे म्हणाले, साहेब मी पाहतो, सांगतो. पण तुम्ही तेवढं सहकार्य करा. मी म्हणालो, ठिक आहे. अन् त्यांनी फोन ठेवला, असं राणे यांनी म्हटले आहे.दरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, दुसरा फोन हा कोविड असताना आला. त्यावेळी माझ्या हॉस्पिटलचं उद्घाटन होते. माझी राज्य सरकारकडे एक परवानगी बाकी होती. तेव्हा त्यांचा फोन आला. तुम्ही फोन केला होता. मी म्हटलो हो. कॉलेजच्या परवानगीसाठी केला होता. उद्धव म्हणाले, साहेब ते तर मिळेलच. पण तुम्हाला सांगतो जरा तुम्ही, प्रेस घेताना तो उल्लेख टाळाल तर बरं होईल. मी म्हटले परत एकदा सांगतो, तुम्ही म्हणता तसा मी उल्लेख केला नाही. पण एक मंत्री होता असं मी म्हणतोय. हे दोन फोन त्यांनी केले, असं राणे यांनी म्हटले आहे. या खुलाशाने राज्यातील राजकीय वातावरणात मोठी खळबळ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.





## विविध वृत्त...

### कार चोरी करणारा आंतरराज्यीय टोळीतील अट्टल गुन्हेगार अजय कटवाल उर्फ नेपाळी जेरबंद



दैनिक आपला विदर्भ

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आंतरराज्यीय टोळीतील घरफोडी व चारचाकी वाहने चोरी करणार्या सराईत गुन्हेगाराला शिताफिने जेरबंद केले. अजय प्रताप कटवाल ऊर्फ नेपाळी याच्याकडून सुमारे तीन लाख रुपये किंमतीची बनावट नंबर प्लेट असलेली कार पोलिसांनी जप्त केली असून आरोपी अजय कटवाल याच्या विरोधात विविध पोलीस ठाण्यात डझनभर गुन्हे दाखल करण्यात आली असल्याची माहिती पोलिस निरीक्षक श्रीराम पवार यांनी यावेळी दिली.

पोलिसांनी अटक केलेल्या आरोपी अजय कटवाल उर्फ नेपाळी याच्यावर दोंडाईचा, नांदगाव पेठ (अमरावती), अंबरनाथ व उल्हासनगर (ठाणे) पोलिसात प्रत्येकी एक, मोहाडीनगर २ , चिपळून (जि. रत्नागिरी) ३, विश्रामबाग (सांगली) २, रामनगर (वर्धा), गाडगे नगर (अमरावती) पोलीस ठाण्यांत २ असे आर्म ऍक्ट, चोरी, घरफोडीचे गुन्हे तर मध्यप्रदेश राज्यात विविध ठिकाणी चारचाकी चोरीचे असे विविध गुन्हे दाखल असल्याची देखील माहिती पोलिसांनी यावेळी दिली.

### जागतिक वन दिवसाचे औचित्य साधून सामाजिक वनीकरण विभागाकडून सायकल रॅलीचे आयोजन





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** २१ मार्च २०२५ जागतिक वन दिवसाचे औचित्य साधून सामाजिक वनीकरण विभाग बुलढाणा व पर्यावरण मित्र मंडळ बुलढाणा यांनी भव्य सायकल रॅलीचे आयोजन केले होते. या सायकल रॅलीला विभागीय वन अधिकारी विपुल राठोड सामाजिक वनीकरण बुलढाणा यांनी हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅलीला सुरुवात झाली. रॅली बुलढाणा शहरातून संगम चौक जयस्तंभ चौक स्टेट बँक चौक विश्रामगृह व परत प्रशासकीय इमारत सामाजिक वनीकरण बुलढाणा येथे सांगता झाली. या रॅलीमध्ये पर्यावरण मित्र प्रदीप डांगे यांनी माकडाचा ड्रेस परिधान करून सगळ्यांचेच लक्ष वेधले. यावेळी पर्यावरण मित्र मंडळाने पर्यावरण पूरक घोषणा देऊन जनजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे.

### अपहरण झालेल्या अल्पवयीन मुलाचा आढळला मृतदेह

**वाशिम/प्रतिनिधी :** अनसिंग पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका गावामधील १४ वर्षीय मुलाच्या अपहरण आणि हत्येचा रहस्यभेद अखेर झाला आहे. १२ मार्च २०२५ रोजी लग्नाच्या मिरवणुकीत नाचण्यासाठी गेलेल्या मुलाचं अपहरण करून खंडणीसाठी ६० लाखांची मागणी करण्यात आली होती. मात्र, पोलिसांच्या कसून तपासानंतर हा गुन्हा जुन्या वादातून झाल्याचं उघडकीस आलय.

१२ मार्चच्या रात्री दोन वाजेपर्यत मुलगा घरी न परतल्यानं वडिलांनी गावभर त्याचा शोध घेतला. त्याचवेळी, त्यांच्या घराजवळ त्यांना एक चिठ्ठी मिळाली. ज्यामध्ये ६० लाखांची मागणी करत, पैसे न दिल्यास मुलाला ठार मारण्याची धमकी देण्यात आली होती. घाबरलेल्या वडिलांनी तत्काळ अनसिंग पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. गुन्ह्याचं गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्या मार्गदर्शनाखाली १८ अधिकाऱ्यांचं तपास पथक स्थापन करण्यात आलं. सायबर पोलीस आणि विविध जिल्ह्यांच्या पोलिसांनी तांत्रिक तपास सुरू केला. तपासाच्या सुरुवातीपासून पोलिसांना प्रणय पदमणे आणि शुभम इंगळे या दोघांवर संशय होता. चौकशीत वारंवार विसंगत जबाब आणि हालचालींमुळं पोलिसांनी त्यांच्यावर विशेष लक्ष ठेवलं. अखेर सखोल चौकशीत प्रणय पदमणेनं गुन्ह्याची कबुली दिली.

# केंद्रातील महायुतीचे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेत आहे : केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव

## कृषी अनुदान प्रस्तावावर लोकसभेत केले शिवसेना पक्षाच्यावतीने भाषण

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी : शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव वाढवून देण्याचं काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील सरकारने गेल्या दहा वर्षात सातत्याने केला आहे हे सरकार शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून विविध निर्णय घेत आहे असे प्रतिपादन हे केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव यांनी लोकसभेत व्यक्त केला आहे.**

केंद्र सरकाराचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू आहे या अधिवेशनादरम्यान कृषी मंत्रालयाच्यावतीने सन २०२५ २६ च्या अनुदान मागणी प्रस्तावावर शिवसेना पक्षातर्फे केंद्रीय आयुष ( स्वतंत्र प्रभार ) आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री तथा बुलढाणा जिल्ह्याचे खासदार भूमिपुत्र प्रतापराव जाधव यांनी लोकसभेत २१ मार्च रोजी भाषण केलं .यावेळी बोलताना ते म्हणाले की शेतकरी पेहराव करून सभागृहात भाषण करण्यापेक्षा शेतकऱ्यांची परिस्थिती काय आहे हे समजून घेणे गरजेचे आहे शेतकरी हा देशाचा पोशिंदा आहे तो उत्पादित करत असलेल्या अन्न धान्यामुळेच आपली अन्नधान्याची गरज पूर्ण होते आहे शेतकऱ्यांनी शेती करणं बंद केलं तर गंभीर समस्या निर्माण होऊ शकते तेव्हा शेतकऱ्यांप्रती आदर ठेवून त्यांना येणाऱ्या समस्याचे निराकरण करण्यासाठी काम करणं गरजेचं आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रात सरकार स्थापन झाल्यानंतर शेतकऱ्यांच्या मालाला चांगला हमीभाव देण्याचे काम करण्यात आल आहे हे स्पष्ट करताना त्यांनी २०१२ -१३ मध्ये सोयाबीनचा हमीभाव हा दोन हजार रुपये होता सध्या शेतकऱ्यांना चार हजार ८९२ रुपये एवढा हमीभाव दिला जात आहे तर तुरीचा हमी भाव २०१२-१३ ला ३ हजार रुपये होता सध्या शेतकऱ्यांना ७ ७५० रुपये एवढा हमी भाव मिळत आहे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शेतकऱ्यांच्या मलाला दुप्पट भाव देऊ अस सांगीतल होत त्यानुसर केंद्र सरकारने हमी भावात वाढ करून शेतकऱ्यांच्या मालाला दुप्पट भाव दिला आहे



असे प्रतापराव जाधव यांनी यावेळी सांगतले शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारण्याचे दृष्टिकोनातून केंद्र सरकारच्या सोबतच राज्य सरकारनेही प्रयत्न करणे गरजेचे असल्यास सांगत असतानाच केंद्र सरकारच्यावतीने पी एम किसान योजनेअंतर्गत दरवर्षी शेतकऱ्यांना ६००० रुपये अनुदान शेती उपयोगी खर्चासाठी दिल्या जाते याच धरतीवर महाराष्ट्रामध्ये सुद्धा भाजप शिवसेना राष्ट्रवादीच्या सरकारने राज्यातील शेतकऱ्यांसाठी नमो महाराष्ट्र शेतकरी सन्मान योजना सुरू केली आहे या अंतर्गत ही शेतकऱ्यांना ६००० रुपयाचे अनुदान दिल्या जाते म्हणजेच महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना केंद्र सरकारचे ६००० व राज्य सरकारचे ६००० असे एकूण १२,००० आर्थिक अनुदान दरवर्षी मिळत आहे गेल्या वर्षी राज्यत कापूस आणि सोयाबीन भावात तफावत निर्माण झाली होती शेतकरी नारज झाले होते तेव्हा राज्य सरकारने ४१ हजार कोटी रुपयांची आर्थिक तरतूद करून तफावतीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये जमा केली पी एम फसल विमा योजनेअंतर्गत केंद्र सरकारचे ४९ टक्के व राज्य सरकारतर्फे ४९% तर शेतकऱ्यांना केवळ दोन टक्के रक्कम भरून त्यांच्या शेतातील पिकाचा विमा काढावा लागत होता त्यावेळी केवळ ४३% च शेतकरी या योजनेमध्ये सहभागी होत होते परंतु महाराष्ट्रातील महायुतीच्या सरकारने केवळ शेतकऱ्यांना एक रुपया भरून विमा काढण्याचा आवाहन केलं तशी सेवा त्यांना उपलब्ध करून दिली त्यामुळे आता महाराष्ट्रामध्ये जवळपास ९५% शेतकरी विमा योजनेअंतर्गत सहभागी होत आहे विमा योजनेत सहभागी झाल्यामुळे त्यांच्या शेतातील पिकाचे नुकसान झालं तर त्यांना मदतही मिळत आहे तेव्हा केंद्र प्रमाणेच राज्य सरकारनेही शेतकऱ्यांच्या हिताच्या दृष्टिकोनातून निर्णय घेणे गरजेचे असल्यास त्यांनी यावेळी अधोरेखित केलं.

## अमरावतीच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट तयार करुन त्यावर काम करणार; आ. खोडके


**बुलढाणा/प्रतिनिधी :** अमरावती विधानसभा मतदारसंघाच्या आमदार सुलभा खोडके यांचा बडनेरा आणि अमरावती या दोन्ही मतदारसंघात एकूण तीन वेळा झालेल्या विजयामुळे मला विधान परिषदेवर संधी मिळाली, असं विधान परिषदेवर नुकतीच निवड झालेले संजय खोडके यांनी म्हटलंय. आता अमरावतीच्या विकासाकरिता कृषी, सार्वजनिक बांधकाम, वन विभाग किंवा नाट्यक्षेत्र अशा विविध क्षेत्रात मातब्बर असणाऱ्या मातब्बरांच्या विचारातून आणि त्यांच्या अपेक्षेनुसार अमरावतीच्या विकासाची ब्ल्यू प्रिंट तयार करून त्यावर काम करणार, असंदेखील आमदार संजय खोडके यांनी स्पष्ट केलंय.विधान परिषद सदस्य म्हणून निवड झाल्यावर पहिल्यांदाच संजय खोडके आज मुंबई-अमरावती गाडीने अमरावती रेल्वे स्थानकावर पोहोचले. यावेळी त्यांच्या हजारो समर्थकांनी फटाक्यांच्या आतषबाजीसह ढोल ताशे वाजवत त्यांचं स्वागत केलंय. क्रेनच्या सहाय्यानं फुलांचा भव्य हार यावेळी संजय खोडके आणि सुलभा खोडके या दोन्ही आमदारांच्या गळ्यात घालण्यात आला.

## प्रशांत डिक्करला दोन दिवसांची पोलीस कोठडी, डिक्करांचा कोठडीत मुक्काम वाढला

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** शेतकऱ्यांनी खंडणी उकळण्यासंदर्भात शुक्रवारी तक्रार नोंदविल्यानंतर शेतकरी संघटनेचे नेते प्रशांत डिक्कर यांच्या विरोधात शेगाव पोलिसात खंडणी चा गुन्हा दाखल करून त्यांना लगेच अटक करण्यात आली होती. शनिवारी त्यांना शेगाव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर पोलिसांनी हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे डिक्ककरांचा पोलीस कोठडीत मुक्काम आणखी वाढला आहे.





बुलढाणा जिल्ह्यातील जिगाव या प्रकल्पासाठी बाधित गाव नवीन ठिकाणी वसविण्यासाठी गावठाण क्षेत्राकरिता शासनाने शेतकऱ्यांच्या शेती घेतलेली आहे. त्यासाठी मोबदला शेतकऱ्यांना दिला जाणार आहे. मात्र हा मोबदला प्रति हेक्टर ४० लाख रुपये मिळवून देतो असे आमिष दाखवून शेतकऱ्यांकडून लाखो रुपये उकडल्याचा आरोप करीत आणखीन पैशासाठी शेतकरी नेते प्रशांत डिक्कर हे त्रास देत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी करीत शुक्रवारी शेगाव येथील जिगाव प्रकल्पा अंतर्गत शेतकरी व अधिकाऱ्यांच्या बैठकीमध्ये प्रशांत डीक्कर यांना शेतकऱ्यांनी लोटपाट करीत बैठकीतून हाकलून लावण्याचा प्रकार समोर आलेला होता. दरम्यान संग्रामपूर तालुक्यातील हिंगणा कवठळ या गावाच्या सरपंचा पुष्पा संदीप मोरखडे यांनी याबाबत शेगाव शहर पोलिसात तक्रार नोंदविली यावरून प्रशांत डिक्कर यांच्या विरोधात खंडणीसह विविध कलमान्वये गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात आली होती. शुक्रवारी रात्रभर पोलीस कोठडीत ठेवल्यानंतर शेगाव पोलिसांनी आज शनिवारी निकर यांना दुपारी शेगाव येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर हजर केले होते. यावेळी सरकारी पक्ष आणि बचाव पक्षाकडून आर्ग्युमेंट झाल्यानंतर न्यायालयाने डिक्कर यांना २४ मार्च पर्यंत पोलीस कोठडी ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मंगळवारी त्यांना न्यायलायसमोर हजर करणार असल्याचे ठाणेदार नितीन पाटील यांनी सांगितले.

## बेलगाव येथील पांदण रस्त्याला दुरुस्तीची प्रतीक्षा

- शेतकऱ्यांसाठी कधी होणार रस्त्याची सुविधा
- शेती व्यवसायाच्या दृष्टीने शेत रस्ते सर्वात महत्त्वाचे

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी :** रस्ते इमारती व पूल विकासाचे पहिले पाऊल हे ब्रीद घेऊन शासन संपूर्ण देशात रस्त्याचे जाळे विनत आहे मात्र जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेत रस्त्याला कुणीही वाली नसल्याने पावसाळ्यात चिखल तुडवत शेतकऱ्यांना शेतात जावे लागते. असाच प्रकार मेहकर तालुक्यातील बेलगाव येथे असून शेतकऱ्यांना शेत रस्त्याचे सुख पदरात केव्हा पडणार ? की नेहमी प्रमाणेच शेतकऱ्यांना आशेवर ठेवणार का ? या बाबतच्या चर्चेला उधाण आले आहे.

शेतकऱ्यांच्या शेती व्यवसायाच्या दृष्टीने सर्वात महत्त्वाचे म्हणजे शेत रस्ते आहेत.अनेक किलोमीटरचे अंतरवरून पायी, बैलगाडी अथवा ट्रॅक्टरने शेत शिवार गाठून शेतीची मशागत करून बारा महिन्याची व्यवस्था करावी लागते. सोबतच कुटुंबातील सुख दुख व इतर गरजा पूर्ण करण्याचे स्वप्न येणाऱ्या पिकातून शेतकरी पहात असतो. झाडा- झुडपांनी व्यापलेल्या शेत रस्ते व पांदण रस्ते खड्डेमय असताना शेतकरी मोठ्या प्रमाणात उत्पादन घेण्याचा प्रयत्न करतो. त्यामुळे पेरणी, फवारणी, निंदन ,डवरे, शेती पिकांना वेळवर लागणारे साहित्य पोहोचवीने ही तारेवरची कसरत करावी लागते. तसेच




संग्रहीत छायाचित्र

रस्त्या अभावी वेळेवर फवारणी करणे शक्य होत नसल्याने किडीचा प्रादुर्भाव वाढवून उत्पादनात घट होते. शिवाय हंगामात तयार झालेला माल ठेवावे लागतो. तरी शासनाने बेलगाव येथील पांदण रस्ते पावसाळा सुरू होण्याच्या अगोदर दुरुस्त करावे, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.

पांदन शेत रस्त्याच्या संदर्भात शेतकरी शासन दरबारी आपली समस्या मांडत आहेत. परंतु, पांदन शेत रस्ते योजनेअंतर्गत शेत रस्ता करावयाचा असल्यास त्याकरिता ग्रामपंचायतच्या ठरावाची मागणी केली जात आहे. वास्तविक पाहता नझुल नकाशात प्रत्येक शिवारातील शेत रस्त्याचे नोंद असते. त्यामुळे पांदन योजना ही प्रत्येक शेत रस्त्यावर उभारल्यास शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळेल. तालुक्यातील बेलगाव येथील शेतकऱ्यांची समस्या लक्षात घेता येतील पांदन रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करावे व शेतकऱ्यांना पावसाळ्यापूर्वी सुस्थितीत रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गाकडून होत आहे.

# जागतिक जल दिन मोठ्या उत्साहात साजरा







दैनिक आपला विदर्भ

## विविध उपक्रमांनी केली पाण्याची जाणीव जागृती

**बुलढाणा/प्रतिनिधी :** आज जागतिक जलदिन मोठ्या उत्साहात जिल्हाभर साजरा करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांचे प्रभात फेरी, जल पूजन असे विविध उपक्रम राबवून पाण्याची जाणीव जागृती करण्यात आली.

दिनांक २२ मार्च रोजी जागतिक जलदिन जगभर मोठे उत्साहात साजरा केला जातो. दिवसें दिवस वाढणारे पाण्याचे दुर्लक्ष कमी व्हावे, लोकांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा, शुद्ध पिण्यायोग्य पाण्याचे महत्व लोकांना कळावे, पाऊस पाणी संकलन करावे, पाण्याचा अपव्य टाळावा यासाठी आजच्या दिवशी मोठ्या प्रमाणावर जाणीव जागृती केली जाते. त्याच अनुषंगाने बुलढाणा जिल्ह्यातही जिल्हास्तरावर, तालुकास्तरावर, गाव स्तरावरही मोठ्या प्रमाणात जाणीव जागृती करण्यात आली. यासाठी शालेय विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरींचे आयोजन करण्यात आले. त्या माध्यमातून पाणी, स्वच्छता, आरोग्य च्या घोषणा देऊन जाणीव जागृती करण्यात आली. तसेच जिल्हा तालुका स्तरावरही पाण्याचे जलपूजन करून जल शपथ घेण्यात आली. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षा कडून बुलढाणा जवळच असलेल्या येळगाव धरणावर जाऊन जलपूजन करण्यात आले आणि जल शपथ घेण्यात आले. या उपक्रमाचे नियोजन प्रकल्प संचालक जल जीवन मिशन तथा कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद बुलढाणा राहुल जाधव तसेच त्यांचे चमूने केले होते.